'अजितदादा' घेणार संचालकपद उमेदवारीसाठी परीक्षा!

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 20/04/२०२5 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 87 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com

# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बीड: बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे 93 वर्षापासून सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या 93 व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आमदार सर्वश्री सुरेश धस, श्रीमती नमिता मुंदडा, श्रीमती मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू असून अजूनही पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले. यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी सुवर्णसंधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक 5 मे ते 14 मे 2025 या कालावधीत एसएसबी (SSB) कोर्स क्र. 61 आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक 24 एप्रिल 2025 रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) च्या वेबसाईटवरून SSB-६१ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे.

पात्रता या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडे खालीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे:



१. कंबाईड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन(CDSE-UPSC) किंवा नॅशनल डिफेन्स अकेडमी एक्झामिनेशन(N D A - UPSC) परीक्षा उत्तीर्ण, तसेच सर्विसेस सिलेक्शन बोर्ड (S S B ) मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी. २. एनसीसी 'C' प्रमाणपत्र 'A' किंवा 'B' ग्रेडसह उत्तीर्ण, आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून एस एस बी S S B साठी शिफारस मिळालेली असावी.३. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी Technical Graduate Course साठी SSB मुलाखत पत्र असणे आवश्यक. ४. विद्यापीठ प्रवेश प्रणाली साठी SSB मुलाखत पत्र किंवा शिफारस यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे training.petenashik@gmail.com या ईमेल, दूरध्वनी क्रमांक 0253-2451032 किंवा व्हॉट्सॲप नंबर 9156073306 वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, मुंबई शहर यांनी केले आहे.

# 'अजितदादा' घेणार संचालकपद उमेदवारीसाठी परीक्षा!

## श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची निवडणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बारामती : भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याची २०२५-२६ ते २०३०-३१ कालावधीसाठी संचालकपदाची निवडणूक होत आहे. कोट्यवधींचे कर्ज असलेल्या या कारखान्याची यंदा राजकीय समीकरणे बदलल्याने इच्छुकांची मोठी भाऊगर्दी झाली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने बारामती येथे गुरुवारी (दि. २४) नामनिर्दिष्ट सर्वपक्षीय उमेदवारांची मुलाखत, चर्चा गटनिहाय आयोजित केली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, कॅबिनेट मंत्री दत्तात्रय मामा भरणे उपस्थित राहणार आहेत.



याबाबत निवडणूक समन्वयक किरण गुजर, सर्वपक्षीय पॅनल प्रमुख पृथ्वीराज जाचक यांनी माहिती दिली.

गुरुवारी सकाळी ९ ते दुपारी ३ या कालावधीत इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. भवानीनगर येथे झालेल्या सर्वपक्षीय कार्यकर्ता सभेत उपमुख्यमंत्री पवार यांनी आदर्श संचालकपदाबाबतच्या त्यांच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे कारखाना पूर्वपदावर आणण्यासाठी क्षमता असणाऱ्या संबंधित उमेदवारांनाच पवार संधी देणार आहेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीसह स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये वेगळे लोक निवडून गेल्यास विकासकामांवर परिणाम होतो. मात्र, दूध संघ, साखर कारखाना निवडणुकीत चुकीच्या लोकांना निवडून दिल्यास त्याची जबरदस्त किंमत मोजावी लागते. ज्यांचा राजकारणाचा संबंध नाही, अशा नवीन चेहऱ्यांना यंदा संधी देणार आहे, जे चांगले काम करतील. कारखान्यात ऊस वाहतुकीला ट्रॅक्टर असणाऱ्यांना अजिबात उमेदवारी अर्ज भरू नये. तसेच विविध पदे भूषविलेल्यांनी देखील अर्ज भरू नये. जनमानसात स्वच्छ प्रतिमा असणाऱ्यांनीच अर्ज करावेत, ज्याचा व्यवसाय, धंदा चांगला आहे, अशा लोकांना अर्ज भरायला सांगा, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री पवार यांनी निवडणूक लढणाऱ्या चेहऱ्याबद्दल व्यक्त केली आहे.

पवार यांच्या अपेक्षेला खऱ्या ठरणाऱ्या इच्छुकांच्याच गळ्यात उमेदवारीची माळ पडणार आहे. यामध्ये मंत्री भरणे यांच्यासह जाचक यांची भूमिका देखील निर्णयक ठरणार आहे.

# पीसीसीओईआर मध्ये 'देव कार्निवल'चे उत्साहात उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यापुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. एआय मुळे रोजगाराच्या संधी जातील अशी भीती व्यक्त केली जाते; परंतु हे खरे नाही. यामुळे रोजगारांच्या संधी, संकल्पना यामध्ये बदल होणार आहे. नव अभियंत्यांनी नोकरी च्या मागे धावण्याऐवजी स्टार्टअप सुरू करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे गुगल डेव्हलपर ग्रुपच्या पुणे विभागाचे प्रमुख महावीर मुथा यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे नेक्स्ट जनरेशन डेव्हलपमेंट क्लब च्या सहकार्याने 'देव कार्निवल'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी कुशल विजय, साज्ञिक घोष, रॉबिन बंटा, तरुण अभिचंदानी, अमोल निटवे, देवेंद्र यादव, पीसीसीओईआर प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सेंट्रल प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अर्चना चौगुले, प्रा. डॉ. महेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.



'देव कार्निवल'मुळे तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांना ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. भविष्यात विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आयटी, ऑटोमेशन, औद्योगिक क्षेत्रात कसे बदल होत आहेत आणि होणार आहेत याची माहिती मिळेल. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला पाहिजे, यामुळे तुमच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावत जातील असे डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी सांगितले.

यानंतर झालेल्या चर्चासत्र मायक्रोसॉफ्टचे कुशल विजय यांनी जनरेटिव्ह एआय आणि त्याचा वापर करून करिअर कसे घडवायचे याविषयी मार्गदर्शन केले. वॉर्कहॅटचे सह-संस्थापक आणि सीईओ साज्ञिक घोष यांनी नो-कोड डेव्हलपमेंट याची माहिती दिली. एसएएसआर अँड डीचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मॅनेजर देवेंद्र यादव यांनी गिटऑप्स आणि त्याचे व्यावहारिक अनुप्रयोग याची माहिती दिली. टीसीएसचे सायबर सिक्युरिटी युनिट - डिलिव्हरी पार्टनर रॉबिन बंटा यांनी सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. गुगलचे वरिष्ठ सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुण अभिचंदानी यांनी औद्योगिक जगातील संधींची माहिती दिली. इव्हॉल्व्हिंगएक्सचे संस्थापक आणि सीईओ अमोल निटवे, एक्सप्लोरव्हीआरचे सह-संस्थापक आणि मियावाकी एक्सप्रेस यांनी उद्योजकतेबद्दलची माहिती सांगितली. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

स्वागत डॉ. अर्चना चौगुले, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सूत्रसंचालन अर्णव वाणी, काव्या अगरवाल यांनी केले. तर आभार डॉ. सोनाली लुणावत यांनी मानले. पुष्कर सारडा, यश यादवडकर, मल्हार गुजर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. सुमारे चारशे विद्यार्थी कार्निवल मध्ये सहभागी झाले होते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

# पैसे जमा झाल्याचा मेसेज पाठवून फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : माझ्या भावाने तुमच्या अकाउंटवर पैसे पाठविले आहेत. ते मला गुगल पे वर पाठवा, असे सांगत पैसे जमा झाल्याचा खोटा मेसेज पाठवून एकाला ५० हजार रुपये पाठविण्यास सांगून त्यांची फसवणूक केली. ही घटना रावेत येथे बुधवारी घडली. महेश सुरेश भोंडवे (वय ३८, रा. शिंदेवस्ती, रावेत) यांनी याबाबत गुरुवारी रावेत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.रावेत पोलिसांनी एका मोबाइलवरून बोलणाऱ्या अनोळखी चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी हे चापेकर चौक, चिंचवड येथून घरी येत असताना त्यांना फोन आला. समोरून एक जण हिंदीमध्ये बोलू लागला की, कैसे हो महेश भाई? पहचाना क्या? रावेत कब आने वाले हो. तेव्हा फिर्यादी यांना वाटले की, कोणीतरी त्यांच्या ओळखीचा व्यक्ती आहे. समोरून अनोळखी इसम फिर्यादी यांना म्हणाला की, माझी आई हॉस्पिटलमध्ये आहे. मी पण तिथे आहे. माझ्या भावाने तुमच्या अकाउंटवर पैसे पाठवले, ते पैसे मला द्या, असे म्हणून फिर्यादी यांना पैसे पाठवल्याचे मेसेज पाठवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी भोंडवे यांनी आरोपीच्या गूगल पे वर थोडे थोडे करून ५० हजार रुपये ऑनलाइन पाठवले.



# आंतरराष्ट्रीय माध्यम परिषदेत डॉ.वृषाली बर्गे यांचा शोधनिबंध सादर



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. वृषाली बर्गे यांनी बँकॉकमध्ये नुकत्याच झालेल्या १० व्या जागतिक माध्यम आणि जनसंवाद परिषदेत संशोधन सादर केले. प्रसिद्ध उद्योजक बिल गेट्स आणि नागपूरचा लोकप्रिय चहा विक्रेता डॉली चायवाला यांच्या भेटीच्या सोशल मीडियावरील प्रभावाचे विश्लेषण त्यांनी शोधनिबंधात मांडले. त्यांच्या शोधनिबंधाचे शीर्षक 'ऑर्केस्ट्रेटेड स्ट्रॅटेजिक सोशल मीडिया 'गेट्स-चायवाला' पीआर को-लॅबोरेशन: अ केस स्टडी ऑफ बिल गेट्स, गेट्स आणि चहा विक्रेता डॉली चायवाला यांच्या भेटीच्या सोशल मीडियावरील प्रभावाचे विश्लेषण बिलियनेअर्स एंगेजमेंट विथ अ लोकल स्ट्रीट टी वेंडर डॉली चायवाला इन इंडिया' आहे.

संशोधनात या भेटीमुळे सोशल मीडियावर निर्माण झालेल्या व्यापक प्रतिसादांचे त्यांनी विस्तृत विश्लेषण केले आहे. यात विविध व्यासपीठांवरील पोस्ट्स, त्यावरील वापरकर्त्यांच्या प्रतिक्रिया, लोकांचा भावनिक प्रतिसाद आणि प्रसारमाध्यमांनी दिलेले कव्हरेज यांचा समावेश करण्यात आला.

प्रतिष्ठित मेडकॉम २०२५ परिषदेत हे संशोधन सादर करणे हा शैक्षणिक कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड असल्याचे मत डॉ. वृषाली बर्गे यांनी व्यक्त केले. गेट्स-चायवाला प्रकरण हे सोशल मीडियाच्या बदलत्या शक्तीचे, विविध समाज क्षमतेचे ज्वलंत उदाहरण आहे.

# तरुणांनो, बोलते व्हा, व्यक्त व्हा... टोकाचा निर्णय घेऊ नका!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: 'तरुणांनो, टोकाचा निर्णय घेऊ नका. बोलते व्हा, आपले मनमोकळे करा. मनातील नैराश्याचे ओझे दूर करून कणखरपणे उभे राहा,' अशी साद कनेक्टिंग ट्रस्टने तरुणाईला व समाजात नैराश्य, तणावाने ग्रस्त लोकांना घातली आहे. सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येने खळबळ उडाली आहे. त्याचबरोबर गेल्या तीन महिन्यात पिंपरी-चिंचवड आणि लगतच्या परिसरात २२४ आत्महत्या झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे तरुणांचे असून, १७७ आत्महत्या पुरुषांनी केल्या आहेत. ही आकडेवारी चिंताजनक आहे. तरुण पिढीच्या मानसिक व भावनिक समस्यांकडे अतिशय गंभीरतेने बघायची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर कनेक्टिंग ट्रस्टने टोकाचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन केले आहे. मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंध यासाठी २० वर्षांपासून



कनेक्टिंग ट्रस्ट हेल्पलाईनद्वारे काम करीत आहे. तणावाखाली, नैराश्यात असलेल्याना भावनिक आधार देत, त्यांना व्यक्त होण्याची संधी देत आत्महत्येपासून परावृत्त केले जात आहे. यासाठी ९९२२००४३०५ आणि ९९२२००११२२ या दोन विनामूल्य हेल्पलाईन आठवड्यातील सातही दिवस सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत कार्यरत आहेत. कॉलच्या सुविधेसह अपॉइंटमेंटद्वारे प्रत्यक्ष भेटून बोलायची सोयही आहे. विनामूल्य अपॉइंटमेंट ८४८४०३३३१२ ह्या क्रमांकावर फोन, मेसेज करून घेता येते. ईमेलद्वारे व्यक्त व्हायचे असेल, तर distressmailsconnecting@gmail.com यावर बोलता येते. या सर्व सुविधा विनामूल्य आहेत.

कनेक्टिंग ट्रस्टचे प्रकल्प समन्वयक विक्रमसिंह पवार म्हणाले, "गेल्यावर्षी (२०२४) एकूण ९३४० कॉल आले. त्यामध्ये ६५ टक्के पुरुषांचे, तर ३५ टक्के महिलांचे कॉल आले होते. या हेल्पलाईनवर सर्वाधिक कॉल १८ ते ४० वयोगटातील व्यक्तींकडून आल्याचे निरीक्षण आहे. हेल्पलाईनवर कोणतेही सल्ला न देता व कोणतीही वैयक्तिक किंवा नैतिक निकष लावलेले निर्णय न देता केवळ सहृद्ध भावनेने त्यांचे ऐकून घेऊन भावनिक आधार दिला जातो. मन मोकळे होऊन भावनिक ताण कमी होण्यास मदत होते. सध्या ४७ प्रशिक्षित स्वयंसेवक ही हेल्पलाईन चालवत आहेत. या कार्यात नवीन स्वयंसेवकांना जोडण्याची संधी आहे. त्यासाठी जूनमध्ये अडीच महिन्याचे प्रशिक्षण आयोजिले आहे. इच्छुकांनी ९८३४४०६०३३ ह्या क्रमांकावर चौकशी करावी."

एका बाजूला तरुण वर्गामध्ये मानसिक आरोग्याविषयी वाढत असलेली जागरूकता आणि संवेदनशीलता दिसते, तर दुसरीकडे याच तरुणाईमध्ये तीव्र मानसिक ताणतणाव आणि आत्महत्येचे वाढते प्रमाण बघायला मिळते. शिक्षण व नोकरीमध्ये येणाऱ्या समस्या, नातेसंबंधांमधील तणाव, आर्थिक अडचणी, मानसिक आजार, कौटुंबिक कलह, सामाजिक विषमता, लैंगिक समस्या, प्रेम प्रकरणातील ताण, व्यसनाधिनता या आणि अशा अनेक समस्या आजच्या तरुणवर्गाला भेडसावत आहेत. या समस्यांचे रूपांतर मानसिक नैराश्यात होऊन आत्महत्येच्या विचारांमध्ये होत आहे. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण सर्वाधिक आहे. याची कारणमीमांसा करायला गेलो, तर अनेक तर्क केले जातात. पुरुष आपल्या समस्यांविषयी सहज बोलते होत नाहीत. पुरुष हा घरातला कर्ता असल्यामुळे त्याने मानसिकरीत्या सक्षम असले पाहिजे, आपला समाज पुरुषांना अतिसंवेदनशील असू देत नाही, अशी काही कारणे यामागे आहेत. तसेच सर्व कौटुंबिक, आर्थिक आणि सामाजिक अपेक्षांच्या ओझ्याखाली बहुतेक पुरुषवर्ग दबला गेला आहे. ज्यामुळे त्यांना आपल्या भावना व्यक्त करणे कठीण होऊन बसते. पुरुष आपल्या मानसिक, भावनिक ताण किंवा समस्यांविषयी आपल्या कुटुंबात किंवा मित्रपरिवारात बोलू शकत नाहीत. भौतिक समस्या, तीव्र भावनिक ताण, नैराश्य आणि कुचंबणा याचे रूपांतर आत्महत्येच्या विचारांमध्ये होते," असेही पवार यांनी नमूद केले.

# 56 हजार रुपयांचे दागिने लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंचर : धामणी (ता. आंबेगाव) येथील काळूबाई माता, तुळजाभवानी माता मंदिरात चोरी झाली आहे.

अज्ञात चोरट्याने सुमारे ५६ हजार रुपये किमतीचे दागिने व इतर ऐवज लंपास केला आहे.धामणी (ता. आंबेगाव) गावच्या हद्दीत हिवरकरमळा येथील काळूबाई माता व तुळजाभवानी माता मंदिरांचे सेफ्टी दरवाजांचे कडीकोयंडे तोडून मंदिरातून वीस हजार रुपये किमतीचे काळूबाई देवीचे पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन वाट्या व चार मोठे मणी असलेले मणी मंगळसूत्र, सोळा हजार रुपये किमतीचे तुळजाभवानी देवीचे चार ग्रॅम वजनाचे चार सोन्याचे मणी असलेली काळ्या मण्यांची पोत, आठ हजार रुपये किमतीचे काळूबाईचे लहान मूर्तीचे दोन ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे मणी असलेली काळ्या मण्यांची पोत, चार हजार रुपये किमतीच्या चारशे ग्रॅम वजनाच्या काळूबाई माता मंदिरामधील चांदीच्या पादुका, चार हजार रुपये किमतीच्या चारशे ग्रॅम वजनाच्या तुळजाभवानी माता मंदिरामधील चांदीच्या पादुका, चार हजार रुपये रोख रक्कम, दोन्ही मंदिरांच्या दानपेट्यांमधील त्यात वेगवेगळ्या चलनी नोटा व नाणी अशा मिळून ५६ हजार रुपयांची चोरी चोरट्यांनी केल्याचे पारगाव पोलिसांनी सांगितले.

या संदर्भात चोरी झाल्याची फिर्याद शंकर सखाराम हिवरकर यांनी दिली आहे.

त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शरद घोडके व ठाणे अंमलदार नरेंद्र गोराणे हे करीत आहेत.



# बिबवेवाडीत वैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार




पुणे : वैमनस्यातून तरुणावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना बिबवेवाडी भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली असून, साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.ओंकार शाहूराज जाधव (वय २५, रा. प्रतिभा निवास, बिबवेवाडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी आदित्य कांबळे (रा. वैभव सोसायटी, कॅनरा बँकेजवळ, बिबवेवाडी) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेले साथीदार देवेन पवार (रा. गॅस गोदामाजवळ, बिबवेवाडी), मेहुल धोखा (रा. गोकुळनगर, कात्रज) यांच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जाधव याने याबाबत बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ओंकार जाधव गुरुवारी रात्री त्याचा मित्र विजय चौहान याच्या दुचाकीवरुन निघाला होता. जाधव आणि पवार यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. जाधवने पवारला शिवीगाळ केल्याने तो चिडला होता. बिबवेवाडीतील महेश सोसायटीसमोर आरोपी पवार आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांनी जाधव याच्यावर कोयत्याने वार केले.गंभीर जखमी झालेल्या जाधवला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेव्हा आरोपी पवार आणि साथीदार धोखा हे खासगी रुग्णालायात गेले. पोलिसांकडे तक्रार करु नको. उपचाराचा खर्च करतो, अशी धमकी त्याला दिली. पोलीस उपनिरीक्षक साळुंखे तपास करत आहेत.

